MHLA050003552023 **<u>विशेष दिवाणी दावा क्र.१८/२०२३ मधील नि.क्र.२९ खालील आदेश</u>**

**<u>[ स्वरा व इतर ..वि..रामराव व इतर ]</u>**

प्रतिवादी क्र.१ ते ५ आणि ८ यांनी सदर अर्ज देऊन नमुद केले की, प्रतिवादी क्र.१ हे लातूर येथील कारागृहात बंदी होते. प्रतिवादी क्र.२ आणि ३ हे वयस्कर आहेत. प्रतिवादी क्र.१ यांची नुकतीच जमिनावर सुटका झाली. नेमलेल्या तारखेस तो न्यायालयात हजर न राहिल्याने त्याच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश झाला. तसेच, प्रतिवादी क्र.२ आणि ३ या वयस्कर व्यक्तीविरुध्द सुध्दा असाच आदेश झाला. प्रतिवादी क्र.४, ५ आणि ८ यांच्यात कौटूंबिक अडचणी उदभविल्याने ते हजर राहु शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश झाला. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचे हक्क, हितसंबंध असल्याने त्याबद्दल त्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळणे गरजेचे आहे. त्याकरीता सदर प्रतिवादींविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत पटलावर घ्यावी अशी विनंती केली आहे.

**२.** वादीने दिलेल्या म्हणण्यावर सदर अर्ज दखलपात्र नसुन प्रतिवादी जाणीवपुर्वक न्यायालयात हजर राहिले नाहीत. प्रतिवादी क्र.१ चे कारण सिध्द करणारे कागदपत्र दाखल नाहीत. त्यामुळे अर्ज रद्द व्हावा अशी विनंती करण्यात आली.

**३.** सदरचा दावा हा वाटपाचा आणि पृथ्थक कब्जाचा असल्याने सर्व पक्षकार जोपर्यंत सामील होत नाहीत तोपर्यंत तो चालविता येत नाही. उपलब्ध पक्षकार यांनी दिलेले कारण संयुक्तिक असल्याचे अर्जासोबतचे शपथपत्रावरुन दिसते. दावा मिळकतीत प्रत्येकाला आपले हितसंबंध मांडण्याचा अधिकार आहे. संधी न दिल्यास अनेक नविन वाद उत्पन्न होतील त्यामुळे प्रतिवादी यांच्याविरुध्द एकतर्फा दावा चालविण्याचा झालेला आदेश प्रत्येकी रुपये २५०/- कॉस्टवरती मंजुर करण्यात येतो. कॉस्टची रक्कम वादींना देण्यात यावी. अशी रक्कम भरल्यानंतर एकतर्फा आदेश रद्द होईल आणि कैफियत पटलावर घेण्यात येईल.

**स्वाक्षरीत/-**

दिनांक : १९/१०/२०२४.

**( एस.एन.सरडे )**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.**